कनिष्ठ सहाय्यक या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत...
(श्री. आनंदा दादाभाऊ औटी, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक, ए.बा.वि.से.प्रकल्प पारनेर)

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/१७५६९७६/७५०/२०२५
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे.

वाचा:- १. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.निप्रआ१९११/ प्र.क्र.८६/११-अ दिनांक १४ ऑक्टोबर २०११
२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.निप्रआ-१११२/ प्र.क्र.८२/११-अ दिनांक २० एप्रिल २०१३
३. इकडील निलंबन आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३५९/२०२५ दि ०९/०५/२०२५
४. इकडील दोषारोप पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३५८/२०२५ दि ०९/०५/२०२५

श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे एकात्मिक बाल विकास प्रकल्प पारनेर, येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा करणे, वरिष्ठांच्या आदेशाचे अवमान करणे अशाप्रकारचे गैरवर्तन केल्याने संदर्भ क्रमांक ३ अन्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करणेत आले होते.

श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) एकात्मिक बाल विकास प्रकल्प पारनेर, यांनी केलेल्या गैरवर्तनाबाबत संदर्भ क्रमांक ४ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (५) च्या तरतुदीनुसार श्री. औटी यांना दोषारोपपत्र १ ते ४ बजावणेत आलेले आहेत.

सबब संदर्भ क्रमांक १ व २ मधील तरतुदी विचारात घेऊन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांना विभागीय चौकशीच्या अधिन राहून जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित करणेत येवून, त्यांना जि.प. ब.पा. उपविभाग श्रीगोंदा. येथे कनिष्ठ सहाय्यक या पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

आणखी असाही आदेश देत आहे की, श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांचे निलंबन कालावधीचा निर्णय शिस्तभंग कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202508110401403 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 11-08-2025 21:33:07
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.ल.पा. उपविभाग श्रीगोंदा.

२/- श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे कनिष्ठ सहाय्यक या पदावर सेवेत रुजू झालेनंतर रुजू अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत:- बालविकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से. प्रकल्प पारनेर यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर